R.No. MHHMAR/25/A3029

# दैनिक महावृत्त

E-mail:dainikmhavratt@gmail.com

R.No. MHHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : १५

दि. २३ डिसेंबर २०२५, वार : मंगळवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## औसा नगरपालिकेत भाजपाचा दारुण पराभव; 'मिनी मुख्यमंत्री' अभिमन्यू पवारांचा विकास दावा मतपेटीतच कोसळला

औसा / प्रतिनिधी :- औसा विधानसभेतील तथाकथित भूतो ना भविष्य विकासाचा दावा अखेर मतदारांनी सपशेल फेटाळून लावला आहे. मिनी मुख्यमंत्री अशी स्वतः ची प्रतिमा निर्माण करणारे भाजपचे आमदार अभिमन्यू पवार यांना औसा नगरपालिकेच्या निवडणुकीत मतदारांनी अक्षरशः जमिनीवर आणून ठेवले आहे.





या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे अफसर बाबा शेख यांच्या नेतृत्वाखाली पक्षाने १७ नगरसेवक निवडून आणत नगरपालिकेवर निर्विवाद सत्ता काबीज केली, तर नगराध्यक्षपदी परविन शेख यांची निवड होऊन राष्ट्रवादीचा झेंडा औसा परिषदेवर फडकला आहे. दुसरीकडे, सत्ताधारी भाजपाला केवळ ५ नगरसेवकांवर समाधान मानावे लागले, तर शिवसेनेची अवस्था तर अवघ्या एका जागेपर्यंत मर्यादित राहिली.

प्रश्न असा आहे की, जर औसा शहराचा इतका अभूतपूर्व विकास झाला असेल, तर भाजपाचा एवढा दारुण पराभव का?

सर्व समाजाला सोबत घेतल्याचा दावा करणाऱ्या आमदारांना मतदारांनी का झिडकारले?

राजकीय निरीक्षकांच्या मते, हा निकाल म्हणजे केवळ पक्षाचा पराभव नसून, अहंकार, सत्तेचा माज आणि स्थानिक प्रश्नांकडे केलेले दुर्लक्ष यावर मतदारांनी दिलेला कठोर निकाल आहे. रस्ते, कामांचे फलक आणि उद्घाटनांची संख्या वाढली; पण सामान्य नागरिकांचे प्रश्न, नगरपालिकेतील दैनंदिन अडचणी, पाणी, स्वच्छता आणि प्रशासनातील मनमानी याकडे दुर्लक्ष झाले, याचा रोष थेट मतदानातून व्यक्त झाल्याचे चित्र आहे.

विशेष म्हणजे, भाजपाची संपूर्ण यंत्रणा, आमदारांची ताकद आणि सत्तेचा प्रभाव असूनही मतदारांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थानिक नेतृत्वावर विश्र्वास टाकत भाजपाला साफ नाकारले. हा निकाल म्हणजे विकासाच्या जाहिरातीपेक्षा जनतेचा अनुभव मोठा असतो याचा ठळक पुरावा मानला जात आहे.

या निकालाने औसा विधानसभेतील राजकारणात भूकंपसदृश परिस्थिती निर्माण झाली असून, आमदार अभिमन्यू पवार यांच्यासमोर आता स्वतःच्या कार्यपद्धतीचा आत्मपरीक्षण करण्याशिवाय पर्याय उरलेला नाही. अन्यथा, हा कौल केवळ नगरपालिकेपुरता मर्यादित न राहता, आगामी विधानसभा निवडणुकीसाठी धोक्याची घंटा ठरू शकतो, असे स्पष्ट संकेत मतदारांनी दिले आहेत.

औसा मतदारांचा संदेश स्पष्ट आहे - सत्ता नव्हे, संवेदनशीलता हवी; फक्त विकासाचे दावे नव्हे, तर जनतेशी थेट नाते हवे.

## आजपासून लातूर महापालिकेच्या अर्ज प्रक्रियेला सुरुवात; देशमुखांचा गड टिकणार की भाजप-अजित पवार गट करणार सत्ता परिवर्तन?









लातूर / प्रतिनिधी :-लातूर शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीचा रणसंग्राम आता अधिकृतपणे सुरू होत असून आज पासून उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू होत आहे. त्याचबरोबर लातूरच्या राजकारणात एकच प्रश्न ठळकपणे उपस्थित झाला आहे -

काँग्रेसचे बालेकिल्ले मानले जाणारे लातूर महापालिका मैदान कोणाच्या ताब्यात जाणार? ही निवडणूक माजी पालकमंत्री व काँग्रेसचे नेते अमित विलासराव देशमुख यांच्यासाठी प्रतिष्ठेची आणि अस्तित्वाची लढाई ठरणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून लातूर महापालिकेवर काँग्रेसचा झेंडा फडकत असला, तरी अलीकडच्या घडामोडींमुळे हा गड हादरल्याचे चित्र आहे.

काँग्रेसमधून माजी महापौर, उपमहापौर, नगराध्यक्ष व प्रमुख नगरसेवकांचे भाजपा व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) मध्ये झालेले पक्षांतर, यामुळे काँग्रेसच्या संघटनात्मक ताकदीला मोठा धक्का बसला आहे. या गळतीमुळे कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण असून, विरोधक मात्र याच संधीचे सत्ता परिवर्तनासाठी शस्त्र बनवत आहेत.

दुसरीकडे, भारतीय जनता पार्टी आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) यांनी लातूर महापालिका जिंकण्यासाठी जोरदार तयारी सुरू केली आहे. जिल्ह्यातील नगरपालिकांमध्ये मिळालेल्या यशामुळे या दोन्ही पक्षांचा आत्मविश्र्वास प्रचंड वाढला असून, यावेळी लातूरही आपलाच असा निर्धार उघडपणे व्यक्त केला जात आहे.

राजकीय जाणकारांच्या मते, ही निवडणूक म्हणजे अमित देशमुख विरुद्ध भाजप-राष्ट्रवादी (अजित पवार) यांची संयुक्त राजकीय ताकद असा थेट सामना ठरणार आहे.

काँग्रेसमधील अंतर्गत नाराजी आवरण्यात देशमुख यशस्वी ठरणार का? की भाजप-अजित पवार गटाचा वाढता प्रभाव काँग्रेसचा गड उद्ध्वस्त करणार? अर्ज भरण्याच्या पहिल्याच दिवशी कोणत्या गटाकडून किती आणि कोणत्या चेहऱ्यांचे उमेदवार मैदानात उतरतात, यावरून सत्तेचा कौल कुणाच्या बाजूने झुकतोय याचे संकेत मिळणार असल्याचे बोलले जात आहे.

एकूणच, लातूर महापालिका निवडणूक म्हणजे केवळ स्थानिक स्वराज्य संस्था नव्हे, तर जिल्ह्याच्या राजकारणाचा टर्निंग पॉइंट आणि आजपासून सुरू होणारी अर्ज प्रक्रिया म्हणजे या महालढतीची पहिली ठिणगी!

लातूरच्या राजकारणात आता एकच प्रश्न घुमतोय - देशमुख गड राखणार, की भाजप-अजित पवार गट इतिहास घडवणार?

## आठवी अ. भा. बौध्द धम्म परिषदेची जय्यत तयारी





लातूर-बौध्द धम्म संस्कार प्रशिक्षण चॅरीटेबल ट्रस्ट तथा सर्व उपासक-उपासिका यांच्या सौजन्याने भिक्खू डॉ. उपगुप्त महाथेरो यांच्या मार्गदर्शनाखाली होऊ घातलेल्या आठव्या अ. भा. बौध्द धम्म परिषदेची जय्यत तयारी महाविहार, धम्म संस्कार केंद्र, सातकर्णी नगर, रामेगाव ता. जि. लातूर येथे करण्यात आली आहे.

दि. २५ डिसेंबर २०२५ रोजी रोजी संपन्न होणाऱ्या एक दिवशीय धम्म परिषदेच्या सभा मंडपाचे रोपन लातूर ग्रामीणचे उपविभागीय पोलीस अधिकारी साहेबराव नरवाडे, उप अभियंता इंजि. संजय सावंत, सरपंच साधना पांडुरंग मगर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. यावेळी भंते बोधीराज, डॉ. सुधाकर गुळवे, डी. एस. नरसिंगे, प्रा. डॉ. संजय गवई, डी. एस. नरसिंगे, प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, विठ्ठल जाधव, प्रा. मा. ना. गायकवाड, प्रा. देवदत्त सावंत, पांडुरंग अंबुलगेकर, भीमराव चौदंते, जि. एस. साबळे, आर.एस. सोनकांबळे, उदय सोनवणे, अनिरुद्ध बनसोडे, ज्योतीराम लामतुरे, राजेश कदम, कुमार सोनकांबळे, सुधाकर कांबळे, पंडित महालिंगे, कुणाल शृंगारे, मधुकर शृंगारे, अन्तेश्र्वर थोटे, संतोष कसबे, नवनाथ कांबळे, विलास घारगावकर, सतीश मस्के, बनसोडे, विशाल वाहुळे, सतीश कांबळे, बालाजी धायगुडे, मिलिंद धावारे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

गुरुवार दि. २५ डिसेंबर २०२५ रोजी संपन्न होणाऱ्या सकाळच्या पहिल्या सत्रात स. ८ वाजता डॉ. आंबेडकर चौक, लातूर येथे पंचरंगी धम्म ध्वजारोहण करून बुध्द मुर्ती सहीत पू. भिक्खू संघ, बौध्द उपासक-उपासिका यांची भव्य धम्म मिरवणूक निघणार असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क, लातूर येथे मुख्य ध्वजारोहण करून मिरवणूकीचे समापन होणार आहेत. त्या नंतर महाविहार, सातकर्णी नगर, बार्शी रोड, रामेगाव येथे दु. उदघाटन दुसऱ्या सत्रात अ. भा. भिक्खू संघ बुध्दगयाचे संघ नायक पू. भिक्खू करुणानंद महाथेरो (दिल्ली ) यांच्या हस्ते आठव्या बौध्द धम्म परिषदेचे उदघाट्न संपन्न होणार असून भिक्खू धम्मसेवक महाथेरो हे अध्यक्षस्थानी असणार आहेत. यावेळी सातकर्णी स्मरणीकेचे विमोचन महाबोधी सोसायटीचे जनरल सेक्रेटरी पू. भिक्खू शिवली महाथेरो (श्रीलंका) यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. यावेळी विशेष अतिथी म्हणून प्रख्यात सिने अभिनेते गगन मलिक यासोबत माजी मंत्री तथा आ. अमित देशमुख, माजी मंत्री तथा आ. संजय बनसोडे, लातूर ग्रामीणचे आ. रमेशप्पा कराड, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर (घुगे), जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, सिद्धार्थ हत्तीहंबीरे इत्यादी मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. याप्रसंगी भ. शरणानंद महाथेरो, भ. प्रा. डॉ. खेमधम्मो महाथेरो, भ. डॉ. यशकाश्यपायन महाथेरो, भ. धम्मानंद महाथेरो, भ. पय्यातिस्स महाथेरो, भ. करुणानंद महाथेरो, भ. दयानंद महाथेरो, भ.धर्मपाल थेरो, भ. पय्यारतन थेरो, भ. महाविरो थेरो, भ. पय्याबोधी थेरो, भ. धम्मबोधी थेरो, भ. रेवत थेरो, भ. ज्ञानसागर थेरो, भ. नागसेनबोधी थेरो, भ. सुमेध नागसेन थेरो, भ. सुभूती थेरो, भ. शिलरत्न थेरो, भ. संघपाल थेरो, भ. धम्मसार थेरो, भ. शाक्यपुत्र राहूल, भ. बोधीधम्मा थेरो इत्यादी भिक्खू संघ उपस्थित राहून विविध विषयानुरूप धम्म देशना देणार आहेत. सायंकाळी धम्म परिषदे नंतर महाराष्ट्राचे प्रसिद्ध गायक विकास राजा (नागपूर) यांचा बुध्द-भीम गीतांचा प्रबोधनात्मक सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न होणार आहे. अशा एक दिवशीय संपन्न होणाऱ्या आठव्या बौध्द धम्म परिषदेस लातूर शहर व जिल्ह्यातील सर्व बौध्द उपासक उपासिकांनी हजारोच्या संख्येने पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून उपस्थित राहून धम्म परिषदेचा लाभ घ्यावा असे आवाहन परिषदेचे संयोजक भिक्खू पय्यानंद थेरो यांनी सभामंडप रोपन कार्यक्रम प्रसंगी केले आहे.

## उत्पादकता वाढविण्यासाठी मिशन नैसर्गिक शेती राबविणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस




नागपूर : शेतीची उत्पादकता आणि गुणवत्ता वाढविण्यासाठी मिशन नैसर्गिक शेती राबविण्याचे राज्य सरकारने ठरविले असून, येत्या २ वर्षात २५ लाख हेक्टर जमीन नैसर्गिक शेती लागवडीखाली येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

लक्ष्मीनारायण इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी (एल.आय.टी.) माजी विद्यार्थी संघटनेतर्फे आयोजित उडान संमेलनात ते बोलत होते. सत्यनारायण नूवाल आणि पद्मश्री डॉ. डी. के. यादव प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ. आर. एल. सोनोलिकर, अरुण दांडेकर यांना जीवन गौरव प्रदान करण्यात आला. तसेच लाइफ टाइम अचिव्हमेंट दीपक लव्हाळा यांना, ज्वेल ऑफ एलआयटी डॉ. सुगंधा गारवे, कीर्ती गणोरकर, आर.जी. कृष्णन, अमित सिन्हा, नीरा चंदना यांना, तर युथ आयकॉन पुरस्कार चिंतन शाह यांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

आज सर्वच क्षेत्रात एआयचा वापर होतो आहे. ती काळाची गरज आहे, त्यामुळे एल आय टी सारख्या संस्थानी मोठ्या प्रमाणात एआयचा स्वीकार करावा, असे आवाहन करुन मुख्यमंत्री म्हणाले की, हे झाले तर जागतिक स्तरावरील स्पर्धे साठी आपण विद्यार्थी घडवू शकू.

फक्त अभ्यासक्रमांनी शिक्षण संस्था मोठी होत नाही, तर ती मोठी होते ती तिच्या विद्यार्थ्यांमुळे, असे पद्मश्री डॉ. यादव यावेळी म्हणाले. दृढ संकल्प असेल तर कोणत्याही क्षेत्रात यश मिळू शकते, असे सत्यनारायण नूवाल यांनी सांगितले.

रावबहादूर डी. लक्ष्मी नारायण यांना लक्ष्मीनारायण गीताद्वारे अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविक एलआयटी माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष माधव लाभे यांनी केले.

मुख्यमंत्री फडणवीस यांचे स्वागत माधव लाभे यांनी केले. सत्यनारायण नूवाल यांचे स्वागत कुलगुरू डॉ. अतुल वैद्य यांनी, तर पद्मश्री डॉ. यादव यांचे स्वागत मोहन पांडे यांनी केले. संघटनेच्या स्मरणिकेचे प्रकाशन अतिथींच्या हस्ते झाले. राकेश गुप्ता, उत्कर्ष खोपकर, मोहन पांडे यांचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे संचालन सचिन पळसोडकर आणि मिली जुनेजा यांनी केले. आभार डॉ. वैद्य यांनी मानले.

## संपादकीय...

# लातूर महापालिका

सत्ता आणि विरोधक – दोघांच्याही कसोटीचा क्षण लातूर शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. या निमित्ताने शहरातील राजकारण तापले असले, तरी हा काळ केवळ प्रचाराचा नाही, तर आत्मपरीक्षणाचा आहे. कारण लातूर महापालिकेची ही निवडणूक सत्ताधाऱ्यांसाठीही आणि विरोधकांसाठीही आरसा दाखवणारी ठरणार आहे.

लातूर महापालिका दीर्घकाळ काँग्रेसच्या ताब्यात राहिली. या राजकारणाचा केंद्रबिंदू म्हणून माजी पालकमंत्री अमित विलासराव देशमुख यांचे नाव घेतले जाते. काँग्रेसने शहराच्या विकासासाठी काही महत्त्वाची पावले उचलली, हे नाकारता येणार नाही. मात्र, दीर्घकाळ सत्ता हातात राहिल्यानंतर निर्माण होणारी बेफिकिरी, अंतर्गत गटबाजी आणि नागरिकांशी कमी होत गेलेला संवाद याची किंमत काँग्रेसला मोजावी लागते आहे, हेही तितकेच खरे आहे.

माजी महापौर, उपमहापौर, नगराध्यक्ष, नगरसेवकांचे एकामागोमाग एक झालेले पक्षांतर हे काँग्रेससाठी धोक्याची घंटा आहे. ही गळती केवळ वैयक्तिक महत्त्वाकांक्षेमुळे झाली की नेतृत्वाकडून दुर्लक्ष झाल्यामुळे – याचे स्पष्ट उत्तर काँग्रेसने मतदारांना द्यावे लागेल. फक्त 'आम्हीच परंपरा' असा दावा आता पुरेसा राहिलेला नाही.

दुसरीकडे, भारतीय जनता पार्टी आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) हे सत्ताबदलाचे स्वप्न पाहत आहेत. जिल्ह्यातील काही नगरपालिकांमध्ये मिळालेले यश, काँग्रेसमधील गळती आणि सत्तेचा वाढता आत्मविश्र्वास यामुळे हे पक्ष आक्रमक झाले आहेत. मात्र, विरोधकांनीही एक प्रश्र्न स्वतःला विचारणे आवश्यक आहे –

सत्ताधाऱ्यांवर टीका करण्यापलीकडे आपल्याकडे लातूरसाठी स्पष्ट, विश्र्वासार्ह आणि दीर्घकालीन आराखडा आहे का?

फक्त काँग्रेसमधून आलेली माणसे म्हणजे पर्याय नव्हे. नागरिकांना नवी दिशा, शिस्तबद्ध प्रशासन, पारदर्शक कारभार आणि ठोस निर्णय हवे आहेत. जर विरोधकांचा अजेंडा केवळ 'काँग्रेसविरोध' इतकाच मर्यादित राहिला, तर मतदार तोही नाकारू शकतात, हे विसरून चालणार नाही.

या पार्श्र्वभूमीवर लातूरकरांची भूमिकाही महत्त्वाची ठरते. रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, वाहतूक, आरोग्य, शिक्षण आणि नियोजन – हे प्रश्र्न कोणत्याही पक्षाचे नसून शहराचे प्रश्र्न आहेत. उमेदवार कोणत्या पक्षाचा आहे, यापेक्षा तो आपल्या वॉर्डसाठी काय करू शकतो आणि काय केले आहे, हे अधिक महत्त्वाचे आहे.

ही निवडणूक सत्ताधाऱ्यांसाठी – विश्र्वास गृहीत धरू नका असा इशारा आहे,

विरोधकांसाठी – पर्याय दिसला तरच सत्ता मिळते ही आठवण आहे,

आणि

लातूरकरांसाठी – चुकीचा निर्णय पाच वर्षांची शिक्षा ठरू शकतो ही जाणीव आहे.


आज अर्ज भरले जात आहेत; उद्या प्रचार होईल; पण शेवटी मतदानाच्या दिवशी शहराच्या भवितव्याचा कौल लागणार आहे.

सत्ता कोणाचीही असो –कारभार उत्तरदायी, संवेदनशील आणि प्रामाणिक नसेल, तर लोकशाहीचा अर्थच उरत नाही.

लातूर महापालिका निवडणूक ही जिंकण्याची नव्हे,
तर जबाबदारी पेलण्याची परीक्षा आहे –
आणि या परीक्षेतसत्ता आणि विरोधक – दोघेही पास व्हायला हवेत.

## माळेगावच्या यात्रेत केजच्या राजाचा बोलबाला;आण्णासाहेब पाटलांच्या घोड्याने यात्रेकरुंचे वेधले लक्ष

केज/प्रतिनिधी–नांदेड जिल्ह्यातील माळेगाव या महाराष्ट्रात



प्रसिद्ध असलेल्या यात्रेतील प्रदर्शनात केज शहरातील आण्णासाहेब सुरेशतात्या पाटील यांचा राजा नावाच्या घोड्याने सर्वांचे लक्ष वेधले.अवघ्या सव्वादोन वर्षाचे वय असलेला चपळ ,गुणी,उमदा घोडा सर्वांचे लक्ष वेधून घेत होता.

यावेळी अनेकांना राजासोबत फोटो काढायचा मोह आवरता आला नाही.

परंपरेने गेल्या तीस वर्षापासून केज येथील पाटलांची राहोटी माळेगाव येथील यात्रेत असते.प्रदर्शनादरम्यान केजचे मनोज दांगट पाटील,आकाश पाटील,दत्ता काकडे,बाळासाहेब कवठेकर,जवळबनचे सरपंच प्रमोद करपे,अमोल वळसे,

सुनील देशमुख,रवी साखरे यांसह गावकऱ्यांनी भेट देऊन कौतुक केले.

# महिलांना माहेर आहे,पण अधिकार काहीच नाही.

कोर्टामध्ये कागदावर शेवटची सही होताच वकिल हसून म्हणाले...

घ्या मॅडम,आता तुमचा घटस्फोट झाला.कोर्टानं तुम्हाला ३० लाख रुपये नुकसान भरपाई मिळवून दिलीये,आणि दर महिन्याला २०,००० रुपये खर्चासाठी मिळत राहतील. आता खुश ना? ती हलकेसे स्मित करून म्हणाली..होखुश आहेआता मला कुणाकडून काही नकोय. वकील कागद गोळा करू लागला.आणि कविता आई–वडिलांसोबत बाहेर पडली.कोपऱ्यात निर्वाण–तिचा नवरा–सगळं शांतपणे पाहत उभा होता.कवितेनं एकदाही त्याच्याकडे पाहिलं नाही.गाडीचं दार बंद झालंआणि नातंही.

पहिला महिना– मायकेत सगळे फार प्रेमानं वागले. कवितेला वाटलं–हेच तर स्वातंत्र्य हाच तर शांतपणा!

दुसरा महिना–घरच्यांचा सूर थोडा बदलू लागला.भाऊ कधी रागानं बोलायचा,

वाहिनी टोमणे मारायची– मोठी झालीस, थोडी जबाबदारी घे ना

भाचेही म्हणू लागले. आत्त्या,किती दिवस राहणार इथे?

तिसरा महिना–घरातलं वातावरण बदलू लागलं.जिथं आधी प्रेम होतं,तिथं आता भार वाटू लागला.कविता शांत व्हायचीपण मनात दुख वाढत राहायचं.

चौथा महिना–तिच्या प्रत्येक गोष्टीवर नजरा ठेवायला लागले.बाहेर पडली की शेजारच्यांची खुसफुस–तिचा घटस्फोट झालायआता माहेरीच राहणार?

कवितेच्या आत काहीतरी तुटत होतं.

तिला पहिल्यांदा जाणवलं–सासरी नातं कठीण होतं,पण ते तिचं स्वतःचं घर होतं.माहेरी ती ना पाहुणी,ना घरची–फक्त एक ओझं.

एक रात्री टेरेसवर बसून ती विचार करू लागली.पैसे मिळालेस्वातंत्र्य मिळालं

पण इज्जत? आपुलकी? आणि घर?

ती स्वतःशी कुजबुजली–चूक केलीफैसला घेताना मी फक्त दुःख पाहिलं,पण परिणाम पाहिलेच नाही तिला कळलं–तुटलेल्या नात्यानंतर बाईला सर्वात जास्त आधाराची गरज असते,पण समाज आधी तिला जज करतो.आणि माहेर

माहेर आहे,पण अधिकार काहीच नाही.

माझं खरं घर मी माझ्या अहंकारानं सोडून आले

डोळ्यात पाणी आलं.निर्णयाची किंमत आता समजत होती.

चार महिने पूर्ण झाले

कवितेला रोज एकच प्रश्र्न सतावू लागला. मी काय गमावलं?

फक्त राग आणि टोमण्यांमध्ये वाहून इतका मोठा निर्णय घेतला?

ती आकाशाकडे बघत बसायचीनिर्वाणच्या आठवणी मागून धावत यायच्या–

त्याच्या सवयी,छोटी भांडणं,आणि सर्वात जास्त–त्याचं साथ देणं.

एका रात्री मन पूर्ण तुटलं.

तिनं फोन उचललानंबर लावला.

कॉल लागला.हॅलो? निर्वाण.

कविता थरथरत्या आवाजात निर्वाणआपणआपल्या नात्याला पुन्हा एक संधी देऊ शकतो का?.मला तुझी फार आठवण येतेमला तुझ्यासोबत राहायचंय

दोन्ही बाजूला काही क्षण शांतता

निर्वाण हळूच म्हणाला– मीही तुझ्याविना राहू शकत नाही

आपली चूक दोघांची होती,सुधारायला दोघांनीच सोबत चालायचंय.

तू 'हो' म्हणालीस

तर मी आत्ताच निघतो.

कवितेच्या गालावरून आसवं वाहू लागली.

हो मी तयार आहे.

रात्रीचे १२ वाजले होते.निर्वाण कार घेऊन निघाला. थंडी,सुनसान रस्तापण मनात एकच आवाज तिला परत घरी आणायचं आहे. सलग ५ तास ड्राइव्ह केला.ना थांबला, ना दमला.सकाळी ५ वाजता तो कवितेच्या माहेरच्या दारात उभा होता.

कविता बाहेर आली घाबरलेली,लाजलेलीपण दिलासा मिळालेला चेहरा.

आई–वडिलांनी दार उघडलं.निर्वाणनं नम्रपणे प्रणाम केला.कवितेने बॅग उचलली.

ना बोलणं,ना वाद दोघांना कळलं, हे निर्णय मनातून घेतलेलं आहे.कार सुरू झाली

आणि कविता परत तिच्या घराकडे खऱ्या घराकडे निघाली.

प्रिय वाचक मित्रांनो...अनेक मित्रांच्या घरातील मुलीच्या मुलांच्या गोष्टी येकायला मिळतात.त्यामुळे घराघरात शांतता भंग पावलेली दिसते.घरात सुखा समाधानाचे आनंदाचे वातावरण राहत नाही.कोणीच उघड बोलू शकत नाही. त्यात काही मुली कोर्टात जातात त्यांना आईवडीलच्या आर्थिक परिस्थितीचा गर्व असतो.त्यामुळे शुल्क कारणाने नाती मोडीत निघतात.आज पर्यन्त कोणते ही न्यायालय या नात्यातील निकाल कधीच देऊ शकला नाही.केवळ तारीख वर तारीख!.लाखों केस फाइल बंद होऊन कपाटात पडल्या आहेत.त्यातील काही फक्त कधी कधी त्यावरील धूळ हळूवार साफ करण्याचे काम करत असतात.मुलीचे मुलाचे वय वाढत जाते.दोघेही एकमेकावर लक्ष ठेवून असतात.मी स्वता अनुभव घेण्यासाठी शहरी आणि ग्रामीण भागातील न्यायालयात फेरफटका मारून माहिति घेतली,कर्मचारी पोलिस अधिकारी आणि न्यायमूर्ती दररोज अनेक प्रकारचे मुली मूल त्यांचे पालक पाहत असतात. खरे खोटे त्यांना कळते पण ते निर्णय घेऊ शकत नाही. ही ते अनुभवाने सांगतात कंटाळतील व कोर्टाचा नाद सोडतील ही त्यांची अपेक्षा असते.योग्य वेळी घेतलेलं छोटंसं पाऊल संपूर्ण आयुष्य वाचवू शकतं. रागाच्या क्षणी घेतलेला निर्णय खरंच आपल्या आयुष्याची दिशा बदलण्या इतका योग्य असतो का? हा विचार प्रत्येक मुलीने करणे गरजेचे आहे. त्याचे समर्थन आई वडिलांनी करतांना पुढील येणाऱ्या दिवसाचा गांभीर्याने विचार करावा. लग्न झाल्यावर मुलगा आई वडिलांचा राहत नाही.हा निसर्गाचा नियम झाला आहे. त्याला शिक्षण आणि संस्कार रोखू शकले नाही.न्यायालय सुद्धा रोखण्यास असमर्थ ठरत आहे.असे घटना सोशल मिडियावर पाठवणारे खूप लोक असतात.स्वतःचे नांव गांव नंबर देण्यास घाबरतात.लोक काय म्हणतील ही भीती अनेकच्या मनात प्रचंड असते.असे लेख सहज वाचनात आले की त्यांचा ड्रॉप लेखाचा संग्रह करून ठेवतो. त्यात योग्य तो शाब्दिक बदल करून असा लेख तयार करून वाचका समोर ठेवतो.काही वाचक जागरूक असतात. यातून बोध घेतात. प्रबोधन करतात. रागाच्या भरात नात्यात निर्माण होणाऱ्या दुरावा शांत पणे समजावून सांगतात आणि पूढील दुर्दवी घटना टाळता येतात.


**सागर रामभाऊ तायडे**
**९९२०४०३८५९,**
**भांडुप,मुंबई.**

# हैदराबाद येथील हुसैन सागर तलावातील तथागत गौतम बुद्धाचा पुतळा साद घालतोय!!

जगातील सर्वात उंच आणि भारतातील एक मोनोलिथ म्हणून गौरवांकित केला गेलेला तथागत गौतम बुद्धांचा भव्य पुतळा हैदराबादच्या प्रसिद्ध हुसेन सागरात अपघाताने बुडाला होता.तत्यानिमित्ताने आंध्रप्रदेशातील हैदराबाद एक निसर्गरम्य शहर म्हणून प्रसिद्ध आहे.हैदराबाद आणि सिकंदराबादच्या मध्यभागी हुसैन सागर नावाचा एक सुंदर सरोवर.आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री श्री.एन.टी.रामाराव यांनी तथागत गौतम बुद्धाचा एक भव्य पुतळा हैदराबाद येथील 'हुसैनसागर' तलावाच्या मध्यभागी उभारण्याच्या कामाला सुरुवात केली होती.हा पुतळा उभारतांना अनेक अडचणी आल्या.पण त्यावर मात करत श्री.एन.टी.रामाराव यांचे स्वप्न पूर्ण झाले.या स्वप्नाचा एक इतिहास आहे.या विषयी आपण जाणून घेऊ या.

श्री.एन.टी.रामाराव हे आंध्र प्रदेशचे १९८३ ते १९८९ या काळात मुख्यमंत्री असतांना १९८४ मध्ये ते न्यूयॉर्क येथे गेले होते.तिथे त्यांनी 'स्टॅच्यु ऑफ लिबर्टी' पाहिला आणि त्यांच्या मनात एक कल्पना आली की आपणही एक बुद्धाचा मोठा स्टॅच्यु (मूर्ती) हैदराबाद येथे उभारला तर? पण बुद्धाचांच का? कारण 'तथागत गौतम बुद्ध' हा भारतात 'सिद्धार्थ' या नावाने जन्मला.तसेच तो मानवतेचे–शांततेचे प्रतिक आहे.'अहिंसा' हे त्याच्या तत्वज्ञानाचे प्रमुख अंग आहे.त्याचे विचार हे मानवतेसाठी उपकारक आहेत.म्हणून त्याचा पुतळा उभारण्याचे त्यांच्या मनाने ठरवले. आणि मग भारतात परत आल्यावर त्या दृष्टीने एन.टी.रामाराव यांनी पावले टाकायला सुरुवात केली.

प्रथम त्यांनी 'रामेश्र्वरम' जवळील एका गावात जन्मलेल्या आणि शिल्पकलेत नावाजलेले 'स्थपती' (म्हणजे वास्तुविशारद –ीलहळींशलीं) पद्मश्री 'सत्यनाथ मुथैय्या गणपती' यांची या कामासाठी निवड केली. आणि त्यांच्या देखरेखी खाली पुतळा 'घडवण्याचे' काम सुरु करण्यात आले. ज्यावेळी त्यांची या बुद्धाच्या पुतळ्याच्या निर्मितीसाठी निवड झाली,तेव्हा प्रथम त्यांनी खूप विचार करून एका खूप मोठ्या, अखंड अशा पांढर्या रंगाच्या 'ग्रानाईट' दगडाची निवड केली.असा दगड त्यांना नलगोंडा जिल्ह्यातल्या 'भोंगीर' या गावाजवळ मिळाला.हैदराबाद येथून जवळच असलेल्या त्यांच्या 'शिल्पशाले'त अनेक शिल्पकारांच्या



सहाय्याने आणि श्री.सत्यनाथ मुथैय्या गणपती यांच्या देखरेखीखाली बुद्धाचा पुतळा घडवायला सुरुवात झाली.या कामाचा शुभारंभ श्री.एन.टी.रामाराव यांचे हस्ते ऑक्टोबर १९८५ मध्ये करण्यात आला. पाच वर्षानंतर हा ५८ फूट उंचीचा आणि ३५० टन वजनाचा बुद्धाचा सुंदर पुतळा तयार झाला.यासाठी अंदाजे २०=८० कोटी रुपये खर्च आला.हा पुतळा उभारण्यासाठी प्रथम हुसैन सागर तलावाच्या मध्यभागी १५ फूट द १५ फूट या आकाराचा,पाण्याच्या पातळीच्यावर राहील असा 'कॉन्क्रीट'चा भक्कम चौथरा उभा करण्यात आला,ज्याला 'रॉक ऑफ जिब्राल्टर' असे संबोधतात. आता प्रश्र्न होता 'बुद्धाचा' पुतळा 'शिल्पशाले' पासून चौथर्यापर्यंत कसा न्यायचा?.कारण वाटेत अनेक घरे होती.पण ती पाडण्यात आली.रस्ते अरुंद होते ते रुंद करण्यात आले. याच सुमारास श्री.एन.टी. रामाराव यांना मुख्यमंत्रीपदावरून पायउतार व्हावे लागले.कारण त्यांचा निवडणुकीत पराभव झाला होता.

श्री.चेन्ना रेड्डी यांची मुख्यमंत्री म्हणून निवड झाली होती.आणि हा बुद्धाचा पुतळा हुसैनसागर तलावाच्या नियोजित चौथ–यावर स्थानापन्न करण्याची जबाबदारी श्री.चेन्ना रेड्डी यांच्यावर येऊन पडली.बऱ्याच चर्चेनंतर आणि या कामासाठी मागवलेल्या टेन्डर्सनुसार मेसर्स ए.बी.सी.लिमिटेड या स्थानिक कंपनीला देण्यात आली.अर्थात त्यासाठी त्यांना मोठ्या थोरल्या 'ट्रॉली'ची गरज लागली.या ट्रॉलीच्या सहाय्याने कंपनीने हा भव्य पुतळा हुसैन सागर तलावाच्या काठापर्यंत तर आणला.पण पुढे तो मध्यभागी असलेल्या चौथ–यापर्यंत 'वाहून' नेण्यासाठी, त्यांनी एका मोठ्ठ्या 'बार्ज'ची (लाकडी तराफा) व्यवस्था केली. १० मार्च १९९० रोजी 'पुतळा' त्यावर ठेऊन,तो लाकडी तराफा, 'बुद्ध' मूर्तीसह, तलावाच्या पाण्यात जेमतेम १०० फूट पुढे गेला नाही,तोच पुतळ्याच्या वजनाने तो एक तराफा कलंडला आणि बुद्धाचा पुतळा पाण्यात तलावाच्या तळापाशी जाऊन त्याला जलसमाधी मिळाली.

या अपघाताच्या वेळी १० कामगार मृत्युमुखी पडले.यात ए बी सी कंपनीचे प्रोजेक्ट डायरेक्टर एस के मुंद्रा यांचे पार्थिव प्रयत्न करुन ही हाती लागले नाही.काही महत्त्वाच्या व्यक्ती दिसेनाशा झाल्या.त्यामुळे अनेक बावडया उठल्या. देशभरातल्या वृत्तपत्रांच्या खास प्रतिनिधींनी या अपघाताची माहिती करताना अनेक प्रश्र्न निर्माण केले.हुसेन सागरातून बुद्ध मूर्ती सुरक्षितपणे बाहेर काढण्यासाठी अनेकांनी आपआपल्या परीने प्रयत्न केले.त्यासाठी बुद्ध मूर्ती बचाव समितीची स्थापना करण्यात आली.प्रा.बी.परमेश्र्वर राव महासचिव होते.मात्र सर्वाधिक चर्चेत राहिले,ते जपानचे पूज्य भदन्त आर्य नागार्जुन सुरई ससाई.त्यांनी ध्येयप्राप्तीचा संकल्प केला.आंदोलनासह उपोषण करण्याचे जाहीर केले. हैदराबादचा हुसेन सागरात बुडालेली बुद्ध मूर्ती बाहेर काढून तिची पुन्हा स्थापना करावी असे कळीचे आव्हान त्यांनी आंध्रप्रदेश सरकारला केले.तत्कालीन प्रधानमंत्री पी व्ही नरसिंहराव आणि पन्नासच्या वर केंद्रीय मंत्र्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांना निवेदन दिले. २ ऑगस्ट १९९१ रोजी ससाई यांनी जाहीर केले की,तीन महिन्याच्या आत बुद्ध पौर्णिमा सागरातून बुद्ध मूर्ती काढण्यात आली नाही तर पौर्णिमा सागराच्या किनारी आपण आमरण उपोषण आरंभ करु.आंदोलनाची तयारी सुरू झाली.नागपूर ते हैदराबाद शांतीमार्च काढायचा आणि तिथे उपोषण आरंभ करायचे.यासाठी सारखा प्रचार सुरू होता.पत्रके आणि पोस्टर काढून जनजागृती करण्याची तयारी सुरू असतानाच बुद्ध मूर्ती काढण्याचा अधिकृत कार्यक्रम आंध्रप्रदेश शासनाने केंद्र शासनाला कळविला.त्याची प्रत ससाई यांना प्राप्त झाली.पुढे तब्बल २ वर्षे तो बुद्धाचा पुतळा पाण्याखाली होता.

त्यानंतर तो पुतळा पाण्यातून काढून चौथ–यापर्यंत नेण्याचा प्रयत्न जवळ जवळ दोन वर्षे चालू होता.पण व्यर्थ. शेवटी परदेशातून या विषयातल्या तज्ञांना पाचारण करण्यात आले आणि गोव्याच्या साल्व्हेज कंपनीने २५ नोव्हेंबर १९९२ रोजी शेवटी त्यांच्या मार्गदर्शनाखाली हा पुतळा यशस्वीरित्या पाण्याबाहेर काढला.बौद्ध जगत अत्यानंदाने न्हाऊन निघाले.चौथर्यावर १ डिसेंबर १९९२ रोजी जिब्राल्टर खडकावर व्यवस्थित बसवण्यात आला.आणि विधिवत बुद्धाच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले.त्या चौथर्यापर्यंत लोकांना जाता यावे म्हणून कायमस्वरूपी 'फेरी बोटीं'ची व्यवस्था करण्यात आली आहे.पुतळ्या भोवतालच्या जागेचे सुशोभीकरण करण्यात आले आहे.अशा त–हेने हा जगताला भगवान बुद्धाचा (त्यावेळचा) अत्यंत भव्य आणि सर्वात उंच पुतळा अनेक अडचणींवर मात करत उभारण्यात आला.२००६ मध्ये सुप्रसिद्ध बौद्ध धर्मगुरू दलाई लामा यांचे शुभहस्ते पुतळ्याची विधिवत पूजा करण्यात आली व या पुतळ्याचे शानदार अनावरण केले.त्यावेळी श्री.चंद्राबाबू नायडू हे मुख्यमंत्री होते.या ठिकाणी दरवर्षी हजारो प्रेक्षक भेट देत असतात.आज ते एक हैदराबाद मधले प्रेक्षणीय प्रेरणादायी लक्षवेधी स्थळ बनले आहे. आपण त्याला एकवेळ जरूर भेट द्यावी.

**सागर रामभाऊ तायडे**
**९९२०४०३८५९,भांडुप,मुंबई**

# प्रश्न विचारणेच गुन्हा ठरत असेल, तर लोकशाही उरली कुठे? – प्रशांत भूषण

लातूर, (प्रतिनिधी)–भारतीय लोकशाही आज एका निर्णायक वळणावर उभी आहे. आणीबाणीच्या काळात सुध्दा तिच्यावर इतकी काळी छाया नव्हती, जितकी आज आहे. घटनात्मक संस्था, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि नागरिकांच्या मूलभूत हक्कांवर गदा आणली जात आहे. प्रश्न विचारणेच गुन्हा ठरत असेल तर लोकशाही उरलीच कुठे? ही गंभीर चिंतेची बाब आहे, असे ठाम मत सर्वोच्च न्यायालयीन वकील ड. प्रशांत भूषण यांनी व्यक्त केले.




प्रशांत भूषण यांना लातूर येथे ड. मनोहरराव गोमारे राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले, त्याप्रसंगी ते बोलत होते. ड. मनोहरराव गोमारे पुरोगामी विचार मंचतर्फे दयानंद सभागृहात त्यांचे 'लोकशाही पुढील आव्हाने' या विषयावर व्याख्यान झाले. त्यांनी सध्याच्या सामाजिक-राजकीय वास्तवाचे कठोर विश्लेषण केले. राष्ट्रीय सन्मान; वैयक्तिक नव्हे, लोकशाहीच्या लढ्याचा गौरव आहे. हा पुरस्कार केवळ एका व्यक्तीचा नसून, लोकशाही मूल्ये, पारदर्शकता आणि उत्तरदायित्वासाठी लढणाऱ्या प्रत्येक नागरिकाचा हा सन्मान आहे. हा सन्मान स्वीकारताना त्यांनी लोकशाही ही जपावी लागणारी प्रक्रिया असून ती आपोआप टिकत नाही, असा सूचक इशारा दिला.

प्रशांत भूषण यांनी आपल्या विश्लेषणात लोकशाहीच्या चारही स्तंभांतील – विधिमंडळ, कार्यपालिका, न्यायपालिका आणि माध्यमे – यांतील समतोल बिघडत चालल्याकडे लक्ष वेधले. विशेषतः न्यायव्यवस्थेची स्वायत्तता आणि माध्यमांची भूमिका या बाबी कमजोर झाल्यास नागरिकांचे हक्क असुरक्षित होतात, असे त्यांनी अधोरेखित केले. लोकशाही संस्थांवर अप्रत्यक्ष दबाव निर्माण होणे ही दीर्घकालीन लोकशाहीसाठी घातक बाब असल्याचे त्यांनी नमूद केले.

असहिष्णुता आणि मौनाची संस्कृतीसामाजिक पातळीवर वाढत चाललेली असहिष्णुता, विरोधी मतांविषयीची संकुचित मानसिकता आणि टीकेकडे देशद्रोहाच्या नजरेने पाहण्याची प्रवृत्ती यामुळे लोकशाहीत संवाद खुंटत असल्याची टीका त्यांनी केली. लोकशाहीत मतभेद हे कमजोरीचे नव्हे, तर बळाचे लक्षण असते; मात्र सध्या प्रश्न विचारण्याची भीती निर्माण केली जात असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला.

'सत्ता कोणाचीही असो, प्रश्न विचारणे आवश्यक'राजकीय संदर्भात बोलताना भूषण यांनी स्पष्ट केले की, सत्ता कोणत्याही पक्षाकडे असो, तिच्यावर प्रश्न विचारणे, निर्णयांची पारदर्शकता मागणे आणि घटनात्मक चौकटीत राहून टीका करणे हेच खरे नागरिकत्व आहे. प्रश्न विचारणाऱ्या आवाजांना दडपण्याऐवजी त्यांचा सन्मान केला गेला पाहिजे, तरच लोकशाही टिकू शकते, असा ठाम संदेश त्यांनी दिला.

लोकशाही ही केवळ निवडणुकांपुरती मर्यादित नसून, सतत जागरूक, प्रश्न विचारणाऱ्या आणि मूल्यांशी बांधील असलेल्या नागरिकांवर ती उभी असते, असे भूषण यांनी अधोरेखित केले. लोकशाहीच्या रक्षणाची जबाबदारी फक्त न्यायालये किंवा संस्था यांची नसून, ती प्रत्येक नागरिकाची आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी सृष्टी दिपक श्रृंगारे या चिमुकलीने मानवतेवर आधारित सुंदर गाणी सादर केली. ड. मनोहरराव गोमारे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन झाल्यानंतर वडाच्या झाडाला उपस्थित पाहुण्यांनी पाणी घालून कार्यक्रमाचे प्रतिकात्मक उद्घाटन केले. नंतर नुकतेच दिवंगत झालेले समाजवादी विचारवंत पन्नालाल सुराणा, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त बाबा आढाव व लोकसभेचे माजी सभापती व लातुरचे सुपूत्र शिवराज पाटील चाकुरकर यांना, दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली वाहण्यात आली.

नंतर प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. पुरस्कार व कार्यक्रमाची भूमिका प्रास्ताविक भाषणात पुरोगामी मंचचे समन्वयक डॉ. गणेश गोमारे यांनी मांडली. ड.मनोहरराव गोमारे पुरोगामी विचार मंचतर्फे लोकशाही मूल्यांवर आधारित संवादाची परंपरा पुढे नेली जाईल, असे त्यांनी सांगितले. प्रा. सुशीला पिंपळे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला, तर अँड. प्रशांत भूषण यांना दिलेल्या मानपत्राचे वाचन प्रा. घनश्याम ताडेवाड यांनी केले. राष्ट्र सेवा दलातर्फे काढण्यात आलेल्या कॅलेंडरचे प्रकाशन यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

त्यानंतर ड. प्रशांत भूषण यांना ड. मनोहरराव गोमारे राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ज्येष्ठ शिक्षणतज्ञ व माजी खा. जर्नादन वाघमारे यांच्या हस्ते त्यांना शाल, मानपत्र, सन्मानचिन्ह व रोपटे तसेच पन्नास हजार रूपये देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर लातुरचे खा. डॉ. शिवाजीराव काळगे, राष्ट्र सेवा दलाचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष सुभाष वारे, प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार, अंनिसचे राज्याध्यक्ष माधव बावगे व पुरोगामी विचारमंचचे समन्वयक डॉ. गणेश गोमारे उपस्थित होते.

यावेळी राष्ट्र सेवा दलाचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष सुभाष वारे व लातूरचे खा. डॉ. शिवाजीराव काळगे यांनी आपले विचार मांडले. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरु डॉ. जर्नादन वाघमारे यांनी अध्यक्षीय समारोप केला. ड उदय गवारे यांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन पर्णवी ढवारे व रुकसाना मुल्ला यांनी केले.

या कार्यक्रमास सामाजिक कार्यकर्ते, कायदे क्षेत्रातील अभ्यासक, विद्यार्थी, विचारवंत आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. लातूरमध्ये झालेला हा सोहळा केवळ पुरस्कार वितरणापुरता मर्यादित न राहता, देशातील लोकशाहीची सद्यस्थिती, तिच्या मर्यादा आणि नागरिकांच्या जबाबदाऱ्या यांवर गंभीर आत्मपरीक्षण घडवून आणणारा ठरला, अशी भावना उपस्थितांमधून व्यक्त झाली.

# दादरमध्ये शिवोत्सवाचे आयोजन

मुंबई (रवींद्र मालुसरे ) : श्री शिवाजी ज्ञानपीठ इंटरनॅशनल आणि मराठी साहित्य व कला सेवा यांच्या संयुक्त विद्यमाने दादर पश्र्चिम येथील धुरू हॉल मध्ये रविवार दिनांक ४ जानेवारी २०२६ रोजी संध्याकाळी ५ ते ८.३० पर्यंत शिवोत्सव – २०२६ आयोजित करण्यात आला आहे. पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय महाराष्ट्र राज्याचे संचालक डॉ तेजस गर्गे हे जागतिक वारसा स्थळे १२ किल्ले जबाबदारी : सरकारची आणि आपली या विषयावर तर शंभू व्याख्याते अक्षय चंदेल यांचे मला समजलेले छत्रपती संभाजी महाराज या विषयावर व्याख्यान होणार आहे. ज्येष्ठ इतिहास संकलक लेखक दुर्गमहर्षी आप्पा परब यांना जीवन गौरव सन्मान पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. शिवदुर्ग मित्र (लोणावळा),डेला ऍडव्हेंचर (लोणावळा ), यशवंती हायकर्स (खोपोली ), निसर्ग मित्र (पनवेल ), नासिक क्लाइंबर्स अँड रेस्क्यूअर्स असोसिएशन (छउठ–) या रेस्क्यू संस्थांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे. संस्थेच्या वतीने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय मोडी लिपी निबंध स्पर्धा, शिवबावनी कथन स्पर्धा, गडकिल्ले छायाचित्रण स्पर्धा यांचा पारितोषिक वितरण समारंभ सुद्धा यावेळी होणार आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य असून शिवप्रेमी आणि इतिहासाच्या अभ्यासकांनी या कार्यक्रमास अगत्याने उपस्थित राहावे असे आवाहन संस्थेचे प्रमुख डॉ. हेमंतराजे गायकवाड यांनी केले आहे




# सुल्लाळीकर – चाकूरकरांच्या स्मरणार्थ काळे वैंद्यकीय महाविद्यालयास सोलर ड्रायर

लातूर : दिवंगत एड. शिवराज पाटील सुल्लाळीकर व माजी केंद्रीय गृहमंत्री स्व. शिवराज पाटील चाकूरकर यांच्या स्मरणार्थ डॉ. सुवर्णा डिगोळे , गितांजली पाटील, चुरी,अमेरिका यांच्या वतीने लातूरच्या कै . बी.व्ही. काळे आयुर्वेद वैद्यकीय महाविद्यालयास सोलर ड्रायर मोफत भेट देण्यात आला.



श्रीमती गीतांजली चुरी, अमेरिका या सोलर एनर्जी द्वारा कार्यरत सोलर ड्रायर तयार करतात. ज्याद्वारे फळे तसेच पालेभाज्या किंवा आयुर्वेद वनस्पती नैसर्गिकरित्या ड्राय करून दीर्घकाळ ठेवण्यासाठी उपयोगी ठरते. त्यांनी असच एक सोलर ड्रायर त्यांनी काळे आयुर्वेद वैद्यकीय महाविद्यालयाला मोफत दिला आहे. त्याचा उपयोग आयुर्वेदिक उपचार घेणाऱ्या असंख्य गरजू रुणांना होणार आहे. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आनंद पवार, डॉ. सुमोल पवार, डॉ. मुळजे, डॉ. चव्हाण, डॉ. निरगुडे, डॉ. महेंद्रकर, डॉ. नरहरे , डॉ. नाईकवाडे, डॉ. पुरी , डॉ. देशमुख, डॉ. नंदनवनकर, डॉ. खानापूरकर, डॉ.उषा गिरीश ब्याळे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

# दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या डॉ.शंकर धनराज बिराजदार यांनी विकसित केले 'गेमचेंजर' मायक्रोरिएक्टर उपकरण व हार्ड मॅग्नेटिक नॅनोमटेरिअल्स निर्मिती तंत्रज्ञान : मेक इन इंडियाला बळ!

लातूर : येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित, दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या भौतिकशास्त्र विभागातील सहाय्यक प्राध्यापक डॉ.शंकर धनराज बिराजदार यांच्या संशोधन कार्याला भारत सरकारच्या भारतीय पेटंट कार्यालयाने अधिकृत मान्यता दिली आहे.या महत्त्वपूर्ण संशोधनाला अधिकृत मान्यता मिळाल्याने दयानंद शिक्षण संस्थेच्या व दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या आणि लातूरच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. त्यांच्या या संशोधन कार्याचे सर्वत्र अभिनंदन व संशोधनाचा गौरव होत आहे.त्यांच्या या सॉफ्ट आणि हार्ड मॅग्नेटिक नॅनोमटेरिअल्स निर्मितीसाठी सुधारित उपकरण व त्याची प्रक्रिया या संशोधनाला मिळालेल्या या पेटंटमुळे देशातील आत्मनिर्भर भारत आणि मेक इन इंडिया उपक्रमाला लक्षणीय चालना मिळणार आहे. डॉ.बिराजदार यांच्या या महत्त्वपूर्ण पेटंट प्राप्त संशोधन कार्यामध्ये एन.आय.टी.सुरत येथील मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील प्रा.डॉ.अतुल आर.सराफ आणि एस.एम.पी. महाविद्यालय,मुरूम येथील डॉ.रवींद्र सी.आळंगे,शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,छत्रपती संभाजी नगर येथील युवराज एस.मुंढे यांचा उल्लेखनीय सहभाग आहे. तसेच एम.आय.टी. छत्रपती संभाजी नगर येथील डॉ. निलेश जी. पाटील,शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,अमरावती येथील डॉ.कुशल वासणकर तसेच डॉ.अनुजा सदावर्ते,ऋषिकेश चव्हाण,मंगेश जामकर या संशोधकांचाही महत्त्वपूर्ण सहभाग आहे.

**नावीन्यपूर्ण तंत्रज्ञान आणि पेटंटचे महत्त्व :**

डॉ.शंकर बिराजदार व त्यांचे संशोधक सहकारी यांनी विकसित केलेले 'अल्टरनेटिंग मॅग्नेटिक फील्ड–सहाय्यित सतत–प्रवाह मायक्रोरिएक्टर' हे एक नावीन्यपूर्ण उपकरण आहे.हे उपकरण नियंत्रित पद्धतीने, उच्च–गुणवत्तेचे फेराइट–आधारित सॉफ्ट आणि हार्ड मॅग्नेटिक नॅनोमटेरिअल्स तयार करते. या तंत्रज्ञानामुळे आता औद्योगिक स्तरावर मोठ्या प्रमाणात, सातत्यपूर्ण आणि उच्च दर्जाचे मॅग्नेटिक नॅनोमटेरिअल्स पदार्थ उत्पादन करणे शक्य झाले आहे. स्थायी चुंबकीय नॅनोकण पदार्थ (सॉफ्ट आणि हार्ड मॅग्नेटिक नॅनोमटेरिअल्स) हे ट्रान्सफॉर्मर कोअर्स, इंडक्टर्स, उच्च–वारंवारता, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, रडार प्रणाली उपकरणे, लाऊडस्पीकर्स, डी.सी. मोटर्स आणि इलेक्ट्रिक मोटर्स यासारख्या अनेक महत्त्वाच्या उद्योगांसाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. पारंपरिक बॅच रिक्टर प्रणालीमध्ये स्थायी चुंबकीय नॅनोकणांच्या निर्मितीदरम्यान त्यांचे समुच्चयन (ऍग्लोमरेशन) होते आणि यामुळे उष्णतेच्या वहनात (हिट ट्रान्स्फर) असमानता निर्माण होते.यामुळे स्थायी चुंबकीय नॅनोकणांचे गुणधर्म अस्थिर होतात आणि अंतिम उत्पादनाची चुंबकीय शक्ती कमी होते. या पारंपरिक पद्धतीत चुंबकीय नॅनोकणांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन केल्यास त्यांच्या गुणवत्तेत घट होते आणि कणांमधील एकसमानता राखणे कठीण जाते.मात्र, हे पेटंटप्राप्त तंत्रज्ञान चुंबकीय नॅनोकण पदार्थाचे (सॉफ्ट आणि हार्ड मॅग्नेटिक नॅनोमटेरिअल्स) मोठ्या प्रमाणावर उत्पादन करतानाही गुणधर्म व गुणवत्ता सातत्यपूर्ण आणि एकसमान राखते. हे चुंबकीय क्षेत्र संश्र्लेषण प्रक्रियेदरम्यान चुंबकीय क्षेत्राची दिशा व तीव्रता कालांतराने बदलते, ज्यामुळे आण्विक स्तरावर कणांच्या संरेखन (अलायनमेंट) व संरचनेवर अत्यंत सूक्ष्म नियंत्रण साधले जाते. कणांची परस्परांना चिकटण्याची समुच्चयन (ऍग्लोमेरेट होण्याची) प्रवृत्ती कमी होते. परिणामी, उत्कृष्ट चुंबकीय गुणधर्म असलेले उच्च दर्जाचे चुंबकीय नॅनोकण तयार करता येतात. विशेषतः, या पेटंटमुळे फेराइट–आधारित (सॉफ्ट आणि हार्ड मॅग्नेटिक नॅनोमटेरिअल्स) स्थायी चुंबकीय नॅनोकणांचे उच्च–गुणवत्तेचे, सातत्यपूर्ण आणि मोठ्या प्रमाणावर उत्पादन औद्योगिक स्तरावर प्रभावीपणे करणे आता शक्य होणार आहे. हे पेटंट प्राप्त झालेले तंत्रज्ञान वापरून स्थायी चुंबकीय नॅनोकण तयार करण्यासाठी खूप कमी वेळ लागतो. पारंपरिक पद्धतींमध्ये लागणारे अतिरिक्त घटक आणि उप–उपकरणे टाळता येतात, ज्यामुळे उत्पादन खर्च कमी होतो. प्रक्रिया सुलभ आणि पर्यावरणास अधिक अनुकूल होते.

**पेटंटचे औद्योगिक महत्त्व आणि आत्मनिर्भर भारत उपक्रमाला लक्षणीय चालना :**

हे तंत्रज्ञान अनेक उद्योगांसाठी 'गेमचेंजर' ठरू शकते. भारत सरकारने ७,२८० कोटींची एक महत्त्वाकांक्षी योजना सुरू केली असून,तिचा उद्देश दुर्मिळ पृथ्वी स्थायी चुंबक (रेअर अर्थ पर्मनंट मॅग्नेटस ) यांच्या देशांतर्गत उत्पादनाला चालना देणे हा आहे. इलेक्ट्रिक वाहने,संरक्षण क्षेत्र आणि नवीकरणीय ऊर्जा यासारख्या अत्यंत महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये वापरल्या जाणाऱ्या या चुंबकांसाठी स्वावलंबी व मजबूत उत्पादन परिसंस्था उभारणे आणि विशेषतः चीनवरील आयातीवरील अवलंबित्व कमी करणे हा या उपक्रमाचा मुख्य हेतू आहे.नोव्हेंबर २०२५ मध्ये मंजूर झालेल्या या सात वर्षांच्या योजनेअंतर्गत, दरवर्षी ६,००० मेट्रिक टन क्षमतेचे रेअर अर्थ पर्मनंट मॅग्नेटस उत्पादन करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.रेअर अर्थ पर्मनंट मॅग्नेटस (जसे की निओडीमियम–लोह–बोरॉन – चुंबक) तयार करण्यासाठी उच्च–गुणवत्तेच्या, सातत्यपूर्ण आणि एकसमान चुंबकीय पदार्थांची आवश्यकता असते. डॉ. बिराजदार यांचे तंत्रज्ञान नेमकी हीच गरज पूर्ण करते.

या पेटंटमुळे दुर्मिळ पृथ्वी स्थायी चुंबकांना (रेअर अर्थ पर्मनंट मॅग्नेटस) सक्षम पर्याय ठरू शकणाऱ्या फेराइट–आधारित (हार्ड मॅग्नेटिक नॅनोमटेरिअल्स) स्थायी चुंबकीय नॅनोकणांचे उच्च–गुणवत्तेचे, सातत्यपूर्ण आणि मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणे शक्य होणार आहे. फेराइट्सचा उपयोग अनेक उच्च–फ्रिक्वेंसी इलेक्ट्रॉनिक उपकरणे, ट्रान्सफॉर्मर कोअर्स आणि मोटर्समध्ये मोठ्या प्रमाणावर केला जातो, जे रेअर अर्थ पर्मनंट मॅग्नेटसच्या उत्पादन साखळीतील महत्त्वाचे घटक आहेत. देशात फेराइट–आधारित स्थायी चुंबकीय नॅनोकण (हार्ड मॅग्नेटिक नॅनोमटेरिअल्स) पदार्थांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन शक्य झाल्यामुळे,रेअर अर्थ पर्मनंट मॅग्नेटस यामुळे, (उत्पादनासाठी) लागणाऱ्या कच्च्या मालाच्या आयातीवरील अवलंबित्व लक्षणीयरित्या कमी होईल, परिणामी भारत सरकारच्या आत्मनिर्भर भारत या महत्त्वाकांक्षी उपक्रमाला लक्षणीय गती मिळेल.

डॉ.बिराजदार आणि त्यांच्या संशोधक चमूने केलेल्या या महत्त्वपूर्ण शोधामुळे देशातील नॅनो–तंत्रज्ञान आणि फेराइट–आधारित हार्ड मॅग्नेटिक नॅनोमटेरिअल्स पदार्थ औद्योगिक उत्पादन क्षेत्राला नवी दिशा मिळाली आहे.या चुंबकीय नॅनोकणांच्या उच्च गुणवत्तेमुळे, आधुनिक उद्योगांची मूलभूत गरज असलेली सातत्यपूर्ण उत्कृष्टता हे तंत्रज्ञान मोठ्या प्रमाणावर साध्य करते, परिणामी देशाच्या औद्योगिक प्रगतीला निश्र्चितच बळ मिळणार आहे.डॉ. बिराजदार आणि त्यांच्या संशोधक चमूने केलेल्या विविध महत्त्वपूर्ण संशोधनांसाठी यापूर्वी त्यांना भारतीय पेटंट कार्यालयाकडून सहा (०६) पेटंट्सची अधिकृत मान्यता मिळाली आहे.संशोधन क्षेत्रात त्यांचे योगदान केवळ देशांतर्गत नाही, तर आंतरराष्ट्रीय स्तरावरही महत्त्वपूर्ण ठरले आहे.डॉ. शंकर बिराजदार यांचे नामांकित आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये एकूण ४५ शोधनिबंध प्रकाशित असून, त्यांनी अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील परिषदांमध्ये आपल्या शोधनिबंधांचे प्रभावीपणे वाचन केले आहे. त्यांच्या संशोधन क्षेत्रातील या अद्वितीय कार्याबद्दल आणि भारत सरकारचे पेटंट मिळाल्याबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमणजी लाहोटी,सचिव रमेशजी बियाणी,संयुक्त सचिव विशाल लाहोटी,संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी डॉ.जयप्रकाश दरगड आणि महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे यांच्यासह सर्व विभाग प्रमुख,इतर प्राध्यापक,शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# गावाची बदनामी करुन प्रशासनास वेठीस धरणाऱ्या उपोषणकर्त्यावर कारवाई करण्यासाठी चिंचोली माळी ग्रामस्थांचे तहसीलदार, गटविकास अधिकारी यांना लेखी निवेदन!

केज/प्रतिनिधी–केज तालुक्यातील चिंचोलीमाळी गावाची हाकनाक बदनामी करुन प्रशासनाला वेळोवेळी वेठीस धरणाऱ्या उपोषण कारवाई करण्यात यावी या मागणीचे लेखी निवेदन चिंचोलीमाळी ग्रामस्थांनी केज तहसीलदार, केज पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्यासह वरिष्ठ कार्यालयास दिले आहे.



याबाबतची सविस्तर माहिती अशी की,रोहन उत्तम गलांडे रा. चिंचोली माळी हा पत्रकार आहे.तो सतत खोट्या बातम्या देऊन चिंचोलीमाळी या गावातील व समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती, लोकप्रतिनिधी यांची बदनामी करून ब्लॅकमेल करत आहे. त्या संबंधाने योग्य ती चौकशी करून त्यांच्यावर कार्यवाही करावी तो गावात सतत गोंधळ घालत असतो, त्यांने यापूर्वी गावातील लहान मोठे व्यापारी, टपरीवाले, हॉटेल वाले यांना ब्लॅकमेल करून त्रास दिला आहे, तरी सदर इसमाची चौकशी करून त्याच्यावर योग्य ती कारवाई करावी, सदर इसमाने यापूर्वी अशीच आंदोलने करून गावातील दोन समाजात तेढ निर्माण केली आहे, चिंचोली माळी हे आमचे गाव गुण्या गोविंदाने राहणारे गाव आहे, आमचे गाव या इसमामुळे पूर्णपणे विस्कळीत झालेले आहे, सदर इसम गावात सतत विनाकारण खाऊन पिऊन उपोषण करतो. व प्रशासनास वेटीस धरतो, तसेच गावातील प्रतिष्ठित लोकांची बदनामी करतो व ब्लॅकमेल करतो, उपोषणादरम्यान सदर इसम अंधारात खातो पितो तरी त्याची वैद्यकीय तपासणी करून त्याच्यावर योग्य ती कारवाई करावी, सदर इसम हा गावात लावलेले लोकप्रतिनिधीचे बॅनर फाडून जमिनीवर टाकतो व त्या बॅनरवर दारू पिऊन झोपतो आणि समाजात तेढ निर्माण करतो. याबाबत केज पोलीस ठाणे येथे तक्रार अर्ज दाखल करण्यात आलेला आहे.

सदर इसम हा त्यांचे खोटे आंदोलन उपोषण हे गावातील श्री संत नामदेव महाराज मंदिरात करतो त्यामुळे आमच्या भावना दुखावत आहेत. तरी त्याला व इतर कोणत्याही व्यक्तीस मंदिरावर आंदोलन, उपोषण करण्याची परवानगी देण्यात येऊ नये. तरी पत्रकार रोहन उत्तम गलांडे याची चौकशी करून त्याच्यावर योग्य ती कारवाई करण्यात यावी. अशा आशयाचे लेखी निवेदन चिंचोलीमाळी ग्रामस्थांच्या वतीने तहसीलदार केज, गटविकास अधिकारी पंचायत समिती केज, जिल्हाधिकारी बीड, पोलीस अधीक्षक बीड, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड, जिल्हा शल्यचिकित्सक बीड, पोलीस उपाधिक्षक उपविभागीय कार्यालय केज, पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे केज, तालुका आरोग्य अधिकारी केज यांना दिले आहे.

सदर मागणीचे लेखी निवेदन हे केज तहसीलचे नायब तहसीलदार अशोक भंडारे यांनी स्विकारले आहे. या लेखी निवेदनावर उपसरपंच सौ.गीता धीरज वनवे, संतोष गलांडे, गोविंद काळे, सोमनाथ शिंदे, शंकर काळे, चॉद शाबुद्दीन पठाण, वशिष्ठ राऊत, गौतम गलांडे, जयदत्त गलांडे, शंकर पवार, अविनाश नखाते यांच्यासह ४९ ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

शासनाच्या ग्रामीण पाणीपुरवठा योजनेच्या विहिरीचे पाणी आम्ही आमच्या शेतात देत नाहीत. व सदर विहिरीचा आम्ही वापर करत नसताना माझी नाहक बदनामी करण्यासाठी रोहन गलांडे यांनी खोटी तक्रार देऊन माझे जनसामान्यात व प्रशासनात नाहक बदनामी केली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने केज पंचायत समिती मार्फत चौकशी समितीने सदर प्रकरणाची चौकशी केली असता माझ्यावर संबंधितांनी बिनबुडाचे व खोटे आरोप केल्याचे सिद्ध झाले असताना देखील. उपोषणाला बसून माझी नाहक बदनामी करत आहे. शासनाच्या विहिरीचा व माझा कसल्याही प्रकारचा संबंध येत नाही. सदर विहिरीपासून माझे शेत हे एक किलोमीटर अंतरावर आहे. त्याकरिता संबंधितांवर तात्काळ योग्य ते कारवाई करण्यात यावी.

सौ.गीता धीरज वनवे(उपसरपंच) चिंचोलीमाळी रोहन गलांडे ही व्यक्ती आमच्याकडून सतत पैशाची मागणी करत आहे. जर आम्ही त्याला पैसे दिले नाहीत. तर आमचे अतिक्रमण काढून आमचे व्यवसाय बंद करीन व तुमच्यावर खोटे स्वरूपाचे गुन्हे दाखल करीन अशा स्वरूपाच्या धमक्या देत आहे. सदर व्यक्ती हा सुपारी बहाद्दर असून आम्हाला त्याच्यापासून धोका होण्याची शक्यता आहे. जर आमच्या जीवितास काही घटना घडल्यास त्यास सर्वस्वी जबाबदार रोहन गलांडे राहील. आमच्या हॉटेल, टपरी, दुकानात येऊन वस्तू घेतो व त्याचे पैसे देत नाही. याउलट संबंधित व्यक्ती ही आमच्याकडून वारंवार पैशाची मागणी करत आहे. व आम्हाला धमक्या देत आहे. त्यामुळे आम्हाला मानसिक ताण देऊन सतत त्रास देत आहे. अशा प्रतिक्रिया चिंचोली माळी येथील ग्रामस्थांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना दिल्या आहेत.

# डॉ.अर्चना पाटील चाकूरकरांच्या हस्ते सुप्रभात ग्रुपच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन

लातूर : लातूर येथील सुप्रभात



फाऊंडेशनद्वारा संचालित सुप्रभात ग्रुपच्या वतीने काढण्यात आलेल्या दिनदर्शिकेचे प्रकाशन रविवारी दुपारी भाजप नेत्या डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या हस्ते करण्यात आले.

दिनदर्शिका प्रकाशनाचा हा सोहळा अंबाजोगाई रोडवरील हॉटेल वन अँड ओन्ली या ठिकाणी पार पडला. यावेळी झरी ( बु. ) चे सरपंच दयानंद सुरवसे, माजी नगराध्यक्ष लक्ष्मण कांबळे यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. या कार्यक्रमात डॉ. अर्चनाताई पाटील यांच्या हस्ते सुप्रभात ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष मोहन गंगाधरप्पा रासुरे , अध्यक्ष राजकुमार मनोहर मस्के यांचा सपत्नीक सत्कारही करण्यात आला. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी आपण बसवेश्र्वरांचे पाईक आहोत, कर्म हीच पूजा समजून चालतो असे सांगितले. स्व. शिवराज पाटील चाकूरकर यांनी समाज कार्याला सर्वतोपरी महत्व देण्याची शिकवण दिल्याचे सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही स्वतः च्या जन्मदात्या आईचे निधन झाल्यानंतर त्यांचा अंत्यविधी उरकून कॅबिनेटची बैठक घेतली होती, ही बाब विसरून चालणार नाही. म्हणून आपणही चाकूरकर साहेबांच्या जाण्यानंतरच्या दुःखद प्रसंगानंतर या दिनदर्शिकेच्या प्रकाशनाच्या अनुषंगाने नवीन वर्षात सुखद कार्याची सुरुवात या निमित्ताने होतेय असे आपण मानून चालतो असेही त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाचे प्रास्तविक दत्तात्रय स्वामी बसपुरे यांनी केले. कार्यक्रमास रुद्राली पाटील चाकूरकर, सुप्रभात ग्रुपचे कार्याध्यक्ष सिद्रामप्पा वाघमारे, उपाध्यक्ष बाबुराव पाचंगे, बाबा गायकवाड, शिवाप्पा टेंकाळे , सचिव देविदास घोडके, नागनाथ काकनाळे, अशोक जाधव, द्वारकादास बिदादा आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोनेराव बेलुरे यांनी तर आभार प्रदर्शन शिवशंकर सुरवसे यांनी केले.

# 'महापारेषण' आणि 'महानिर्मिती'मध्ये ७६५ के.व्ही. पारेषण प्रकल्पासाठी सामंजस्य करार

मुंबई : राज्यातील वीज वहन यंत्रणा



अधिक बळकट करण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी (महापारेषण) आणि महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनीमध्ये (महानिर्मिती) सामंजस्य करार झाला. महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार आणि महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी. यांच्या प्रमुख उपस्थितीत सामजस्य करार पार पडला. ७६५ के.व्ही. क्षमतेच्या पारेषण प्रकल्पासाठी 'टॅरिफ बेस्ड कॉम्पिटिटिव्ह बिडिंग' (ढइउइ) अंतर्गत संयुक्तपणे निविदा सादर करण्याचा निर्णय दोन्ही वीज कंपन्यांनी घेतला आहे.

यावेळी महापारेषणचे संचालक (संचलन) सतीश चव्हाण, संचालक (प्रकल्प) अविनाश निंबाळकर, संचालक (वित्त) श्रीमती तृप्ती मुधोळकर, मुख्य विधी सल्लागार विजय पाटील, मुख्य अभियंता (ढइउइ) अमित नाईक तसेच महानिर्मितीचे संचालक (वित्त) मनेश वाघिरकर, संचालक (प्रकल्प) अभय हरणे, मुख्य विधी सल्लागार डॉ. कीर्ती कुलकर्णी व इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यामुळे महापारेषणचा पारेषण क्षेत्रातील अनुभव आणि महानिर्मितीची मोठ्या वीज प्रकल्पांच्या अंमलबजावणीतील तांत्रिक कार्यक्षमता एकत्र येणार आहे. ७६५ के. व्ही. श्रेणीतील प्रकल्पांसाठी या दोन शासकीय कंपन्यांचे एकत्र येणे, राज्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

प्रकल्पाचे महत्त्व बळकट ग्रीड : या नवीन प्रकल्पांमुळे वीजवहन क्षमता वाढून ग्रिड अधिक स्थिर होण्यास मदत होईल.

शासकीय कंपन्यांची स्पर्धात्मकता : राज्यातील दोन प्रमुख शासकीय ऊर्जा कंपन्या एकत्र आल्याने प्रकल्प खर्चात बचत आणि गुणवत्तेत वाढ अपेक्षित आहे.

भविष्यातील गरज : भविष्यातील वाढती विजेची मागणी लक्षात घेता ७६५ के.व्ही.ची यंत्रणा ही 'पॉवर कॉरिडॉर'साठी कणा ठरणार आहे.

या धोरणात्मक निर्णयामुळे महापारेषणचे देशातील अग्रगण्य राज्य पारेषण कंपनी म्हणून स्थान अधिक मजबूत होईल. महानिर्मितीसोबतच्या या समन्वयामुळे मोठ्या प्रकल्पांची अंमलबजावणी वेगाने आणि अधिक तांत्रिक सक्षमतेने करणे शक्य होणार आहे.

# स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कारांसाठी अर्ज पाठविण्याचे आवाहन

नवी दिल्ली : मराठी भाषेतल्या साहित्य निर्मितीबद्दल राज्य शासनाच्या वतीने दिल्या जाणाऱ्या यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार २०२५ साठी अर्ज मागविण्यात आले आहेत. १ जानेवारी ते ३० डिसेंबर २०२५ या कालावधीत प्रकाशित झालेली प्रथम आवृत्ती पुस्तके या स्पर्धेसाठी पात्र आहेत. मुंबईच्या रवींद्र नाट्यमंदिरात ३० जानेवारी २०२६ पर्यंत महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडे पुस्तके पाठवावीत, असे आवाहन मंडळाच्या सचिवांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

मंडळाच्या कार्यालयात तसेच मुंबई शहर आणि मुंबई उपनगर हे दोन जिल्हे वगळता इतर ठिकाणी जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयात तर 'सरफोजीराजे भोसले बृहन्महाराष्ट्र पुरस्कारा'साठी महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली येथे प्रवेशिका पाठविता येणार असून प्रवेशिका विनामूल्य उपलब्ध आहेत. लेखक आणि प्रकाशक या स्पर्धे साठी प्रवेशिका पाठवू शकतात.

'सरफोजीराजे भोसले बृहन्महाराष्ट्र पुरस्कार' हा खास बृहन्महाराष्ट्रातील उत्कृष्ट साहित्य निर्मितीसाठी प्रदान करण्यात येणार आहे. या श्रेणीत उत्कृष्ट साहित्य निर्मितीसाठी साहित्याच्या सर्व प्रकारातील साहित्यकृती या पुरस्कारासाठी पाठविता येणार असून उत्कृष्ट साहित्यकृतीस 'सयाजी महाराज गायकवाड पुरस्कार' (पुरस्कार रक्कम १,००,००० रूपये) प्रदान करण्यात येणार आहे.

बृहन्महाराष्ट्र क्षेत्रातील विजेत्यांसाठी 'सरफोजीराजे भोसले बृहन्महाराष्ट्र पुरस्कार' (सर्व साहित्य प्रकार) साठी निवड केली जाईल. प्रवेशिका पूर्णत: भरुन आवश्यक साहित्यासह सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या कार्यालयात किंवा महाराष्ट्र परिचय केंद्र नवी दिल्ली यांच्याकडे ३१ जानेवारी २०२६ पर्यंत पोहचतील अशा बेताने पाठवाव्यात. लेखक / प्रकाशक या स्पर्धेसाठी प्रवेशिका दाखल करु शकतात.

महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.iप या संकेतस्थळावर 'नवीन संदेश' या सदरात 'स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार नियमावली व प्रवेशिका' या शीर्षाखाली व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या https://sahitya.marathi.gov.in/ या संकेतस्थळावर प्रवेशिका व नियम पुस्तिका उपलब्ध आहे. यासह या स्पर्धे ची नियमावली व प्रवेशिका सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, रवींद्र नाट्य मंदिर इमारत, दुसरा मजला, सयानी रोड, प्रभा देवी, मुंबई–४०० ०२५ यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे. तसेच, बृहन्महाराष्ट्रातील लेखक व प्रकाशकांसाठी महाराष्ट्र परिचय केंद्र, ए/८, स्टेट एम्पोरिया बिल्डींग, बाबा खडक सिंह मार्ग, नवी दिल्ली या कार्यालयातही स्पर्धेची नियमावली व प्रवेशिका उपलब्ध आहे.

स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजनेअंतर्गत एकूण चार विभागात ३५ साहित्य प्रकारांसाठी प्रवेशिका मागविण्यात आल्या आहेत. प्रौढ वाङ्:मय विभागात एकूण २२ साहित्य प्रकार असून प्रत्येकी १ लाख रुपये या प्रमाणे एकूण २२ लाख रूपयांची पुरस्कारांची रक्कम आहे. बाल वाङ्:मय विभागात एकूण सहा साहित्य प्रकारात प्रत्येकी ५० हजार रुपये याप्रमाणे एकूण ३ लाख रूपयांची पुरस्कार रक्कम आहे.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर – ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर – ४१३५१२ येथे प्रकाशित केले.